स्थापना दि. 25/08/1953

# ग्रामपंचायत कार्यालय, धोडांबे

ता. चांदवड , जि. नाशिक पिन ४२३११७

जा.क्र.

## इमारत बांधकाम परवाना

दि. ११/०३/२०२४.

**श्री.-काशिनाथ रेवणआप्पा तोडकर रा.-धोडंबे ता.चांदवड जि.नाशिक यांस**

विषय: इमारत बांधणी परवानगी

संदर्भ: तुमचे कडील दिनांक -२०/०२/२०२४ चे अर्जावरून तुम्हास ग्रामपंचायत हद्दीतील घं.नं. ३३२/१,२ येथील इमारतीचे बांधकाम करणेची परवानगी ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ५२ अन्वये खालील अटींस व शर्तीस अधिन ठेवून परवानगी देत आहे.

## * इमारत बांधकामाचा तपशिल *

**ग्रामपंचायत मासिक सभा दि. २१/०२/२०२४ नुसार ठराव क्रमांक ९९/२ विषय क्र.२ अन्वये ग्रामपंचायत मिळकत नं.३३२/१,२ व सिटी सर्वे क्र.२१५ मध्ये मंजूर PLAN प्रमाणे बांधकाम करणेत यावे .मंजूर PLAN व्यतिरिक्त केलेले बांधकाम बेकायदेशीर ठरविले जाईल.**

पाळावयाचे शर्ती:

१) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील अटी व शर्तीस अधिन राहून बांधकाम करावे.

२) परवान्याप्रमाणे बांधकाम करावे त्याशिवाय झालेले बांधकाम बिगर परवाना समजले जाईल व बेकायदेशीर रितीने केलेले काम पुढील कारवाईस पात्र राहील.

३) ग्रा.पं.का.क. ५२ (३) अन्वये बांधकामाची परवानगी दिले पासून १ वर्षाचे आत बांधकाम पूर्ण न केल्यास सदर परवाना आपोआप रद्द होईल.

४. बांधकाम करतांना पंचायतीच्या अगर सरकारच्या जागेत अगर सार्वजनिक जागेत अतिक्रमण करू नये असे अतिक्रमण केल्यास ग्रा.पं. का.क. ५२४५० ची शिक्षा व अतिक्रमण अन्य प्रत्येक दिवसास रु. ५ (अक्षरी रुपये पाच) पर्यंत दंडाच्या शिक्षेस पात्र धरले जाईल.

५. ग्रा.पं.का.क. ५२(५) अन्वये असणारे व केलेले अतिक्रमण पंचायत सेवकाकडून अगर मजुर लावून काढून टाकणेस येईल.

६. अतिक्रमण काढने कामी होणाऱ्या खर्चास आपणास जबाबदार धरले जाईल व तो खर्च ग्रा.पं. का. का. १२१ करवसुलीची थकबाकी म्हणून वसूल केली जाईल.

७. बांधकाम करतांना बांधकामासाठी लागणारे मटेरीयल हे सरकारी अथवा सार्वजनिक जागेत टाकू नये. मटेरीयल साठी पंचायतीची अगर सरकारी जागा असल्यास पंचायतीची आगाऊ परवानगी काढून सदर जागेचे भाडे भरून नंतरच मटेरीयलसाठी जागा वापरावी.

८. बांधकाम परवानगी शिवाय इतर सरकारी नियमाप्रमाणे लागत असणाच्या परवानगी ज्या त्या

संबंधीत खात्यामार्फत काढणेची जबाबदारी तुमचेवर राहील.त्यास पंचायत जबाबदार राहणार नाही.

९. बांधकाम करतांना तुमचे स्वतःचे जनावरे, सामान, ओटा, या कामी तुमचे मालकीची जागा व्यतिरिक्त सार्वजनिक रस्त्यावर ठेवू नये किवा बंधू नये.

१०.सार्वजनिक रस्त्यावर हवाई अतिक्रमण करू नये वरील प्रमाणे अटी व नियमांचे उल्लंघन झाल्यास दिलेली परवानगी रद्द समजणेत येईल.

11. बेकायदेशीर बाबीस पंचायत जबाबदार राहणार नाही.

१२. दुसऱ्यांचे जागेत अतिक्रमण करू नये

१३. नविन केलेल्या बांधकामास पाणी अडवा, पाणी जिरवा अंतर्गत रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे गरजेचे आहे. किमान ५ झाडे लावणे आपणास बंधनकारक राहील.

**महत्वाची सूचना : - इमारत क्षेत्रात शौचालय बांधणे बंधनकारक राहील**

**वरील अटी व शर्तीना आधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.**

ग्रुप ग्रामपंचायत-धोडांबे
घोडांबे स्थापना दि.२५/०८/१९९०
ता.चांदवड जि.

ग्रामविकास अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत-धोडांबे
ता.चांदवड,जि.नाशिक

सरपंच
ग्रुप ग्रामपंचायत-धोडांबे
ता.चांदवड,जि.नाशिक